# सातवे गिरिमित्र सम्मेलन : १२ व १३ जुलै २००८

महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड यांच्या विद्यमाने दरवर्षी आयोजित करण्यात येणारे गिरिमित्र संमेलन १२ व १३ जुलै रोजी नेहमीच्याच उत्साहात पार पडले. या सातव्या गिरिमित्र संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना होती 'गिर्यारोहणातून संवर्धन'. याच वर्षी भारतीय गिर्यारोहकांच्या शिखर संघटनेला (IMF) ५० वर्ष तर, हिमालयन क्लबला ८० वर्षे पूर्ण झाली होती. म्हणूनच संमेलनाच्या पूर्वसंध्येला, म्हणजे १२ जुलैला संध्याकाळी, एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सुरवातीस या दोन्ही संस्थांच्या कार्याची माहिती देणा-या चित्रफिती दाखविण्यात आल्या. तदनंतर दोन्ही संस्थांच्या पदाधिका -यांच्या बरोबर विशेष संवाद साधला गेला. त्यात आयएमएफतर्फे कर्नल एच.एस. चौहान, सचिव (IMF) आणि कर्नल नरेंद्र कुमार (पहिल्या कांचनगंगा यशस्वी मोहिमचे नेते) या दिल्लीतील पाहुण्यांचा सहभाग होता. तर हिमालयन क्लबतर्फे श्री. हरीष कापडिया, श्री दिव्येश मुनी आणि श्री तनील किलाचंद या पदाधिका-यांबरोबर दिलीप लागू आणि वसंत घाग यांनी संवाद साधला. संमेलनाच्या पूर्व संध्येला झालेल्या या विशेष कार्यक्रमामुळे या दोन दिग्गज संस्थांनी गिर्यारोहण क्षेत्रात दिलेल्या योगदानाची माहिती उपस्थितांना मिळाली. तसेच संमेलनाच्या आदल्या दिवशी खास हार्ड कोअर गिर्यारोहकांसाठी सुरू केलेल्या या पूर्वसंध्येच्या कार्यक्रमाचा एक नवा पायंडा पडला.

१३ जुलैच्या सकाळच्या सत्राची सुरुवात छायाचित्र प्रदर्शनाच्या उदघाटनाने झाली. मुख्य कार्यक्रमात महाराष्ट्र सेवा संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर वझे यांनी सेवा संघाच्या कार्याचा आढावा घेत गिरिमित्र संमेलनाचे प्रयोजन सांगितले. त्यानंतर संमेलनाचे अध्यक्ष श्री. चौहान व व्यासपीठावरील इतर मान्यवरांच्या हस्ते गिरिमित्र पुरस्कार प्रदान करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात श्री. चौहान यांनी संमेलनाच्या कल्पनेचे कौतुक केले व दिल्लीतही इतके छान संमेलन कधी झालेले नाही, अशी माहिती दिली. शिवाय आयएमएफतर्फे मदतीचे आश्वासनही दिले. इतर मान्यवरांनीदेखील आपल्या भाषणात, संमेलनाच्या संकल्पनेचे व प्रयत्नांचे कौतुक केले. आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे ही सर्व भाषणे चालू असताना प्रकृती अस्वास्थामुळे उपस्थित राहू न शकलेले आयएमएफचे अध्यक्ष मेजर एच. पी. एस. अहलुवालिया यांनी भ्रमणध्वनीवरून सर्वांशी संवाद साधला. त्यानंतर आयएमएफ व हिमालयन क्लब या दोन्ही संस्थांच्या कार्याची माहिती देणा-या चित्रफिती दाखविण्यात आल्या. व्यासपीठावरील पाहुण्यांना मराठमोळे फेटे बांधण्यात आल्यामुळे कार्यक्रम खूपच 'रंगतदार' दिसत होता.

दुपारच्या सत्राची सुरुवात प्रसिद्ध इतिहास संशोधक व अभ्यासक श्री. निनाद बेडेकर यांच्या व्याखानाने झाली. त्यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्रातील गडकोटांच्या दुरावस्थेचे विदारक चित्र स्पष्ट केले. अनेक गिरिप्रेमींनी गडाच्या जपणुकीसाठी केलेले प्रयत्न, इटलीसारख्या देशातील पुरातत्व ठेवा जपण्याची पद्धत व आपल्याकडील सरकारी अनास्था याची तुलना केली. एकंदरीतच दुर्ग संवर्धनाच्या अनुषंगाने एक वेगळा दृष्टीकोन यातून समोर आला. त्यानंतर श्री. वसंत घाग यांनी संमेलनाच्या संकल्पनेवर सादरीकरण केले. ज्यात संवर्धनात कार्यरत असलेल्या महाराष्ट्रातील संस्थांची माहिती देण्यात आली.

डोंगर भटकंती दरम्यान पुरेशी सुरक्षा सावधानता न बाळगल्यामुळे होणा-या अपघातांचे प्रमाण वाढल्याच्या पार्श्वभूमीवर 'डोंगरातील शाळा' हा खास माहितीपट यावर्षी संमेलनातर्फे सादर करण्यात आला. या माहितीपटासाठी चारुहास जोशी, डॉ. मिलिंद चितळे व शंतनू पंडित या तज्ञ व्यक्तींनी खास प्रयत्न केले. यानंतर कार्यक्रम होता पुरस्कार प्राप्त चित्रफितींचे सादरीकरण.

नेचर लव्हर्सचे दिनेश ठोसर हे संमेलन प्रमुख होते. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेच्या अनेक सभासदांनी संमेलन यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली. त्यातही श्री रमाकांत गुरव, राजन बागवे आणि श्री. जितेंद्र अष्टेकर यांचा खास उल्लेख करता येईल. यावेळी श्री. नितीन जाधव यांनी वसंत घाग यांच्याबरोबरीने मेहनत घेऊन तयार केलेली एक स्मरणिका प्रकाशित करण्यात आली. संमेलन यशस्वी करण्यासाठी अनेक संस्थांचे सहकार्यही लाभले.
शेवटी पुढील वर्षी पुन्हा भेटायच्या इराद्याने सर्व गिरिप्रेमींनी एकमेकांचा निरोप घेतला.

*****************